दि.दावा क्र.१२७/२०१५
नि.क्र. १६

**<u>वादीचा सरतपास ॲड. श्री. पिंपळकर यांचे मार्फत :-</u>**

आता मला माझे सर तपासाचे प्रतिज्ञापत्र दाखविले. ते माझ्या सांगण्याप्रमाणे लिहीलेले आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे.

**मी खालीलप्रमाणे दस्तऐवज दाखल केलेले आहे :-**

१. मी दावा मिळकतीचा सिटी सर्व्हे नं.१८८८ व १८८६ चा नकाशा दाखल केला आहे. त्याला नि.४२ देण्यात येते.

२. मी टॅक्स पावती दाखल केली आहे. त्याला नि.४३ देण्यात येते.

३. आर डी नं.२/२००७ ची नि.१ ची प्रत व त्यावरील आदेश दि.८.४.१० रोजी झालेला दाखल केला आहे. त्याला नि.४४ देण्यात येते.

४. आर डी नं.२/२००७ मधील पजेशन वारंटची प्रत दाखल केली आहे. त्याला नि.४५ देण्यात येते.

५. कब्जा रशीद दाखल केली आहे. त्याला नि.४६ देण्यात येते.

६. नि.१३ कडील पुरसीस व नि.१२ चा अर्ज दाखल केले आहे. त्यांना नि.४७ व नि.४८ देण्यात येते.

७. मी रेंट कंटोल कायदयाअंतर्गत प्रोसिडींग दाखल केली होती, त्याचा अर्ज दाखल केला आहे. त्याला नि.४९ देण्यात येते.

८. रेंट कंटोल कायदयाअंतर्गत प्रोसिडींग दाखल केली होती त्यावरील दि.२५.२.१९९७ रोजी झालेला आदेश दाखल केला आहे. त्याला नि.५० देण्यात येते.

९. आरसीएस क्र.५४/१९९७ मधील न्यायनिर्णय व हुकूमनामा दाखल केले आहे. त्यांना नि.५१ व नि.५२ देण्यात येते.

१०. आर डी.क्र.४१/२००२ ची नि.१ ची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. त्याला नि.५३ देण्यात येते.

११. त्यामधील कब्जा वारंट, कब्जा पुरसीस, कब्जा रसिद दाखल केले आहे. त्यांना नि.५४ ते नि.५६ देण्यात येते.

१२. आर डी नं.१६/२०११ मधील दोन समन्स दाखल केले आहे. त्याला नि.५७ व नि.५८ देण्यात येते.

१३. आर डी नं.१६/२०११ मधील नि.१ ची प्रत दाखल केली आहे. त्याला नि.५९ देण्यात येते.

१४. आर डी नं.१६/२०११ मधील नि.४८ अर्ज दाखल केले आहे. त्याला नि.६० देण्यात येते.

१५. आर डी नं.१६/२०११ मधील रेफरल ऑर्डर, मिडीयेशन रिपोर्ट व पुरसीसची प्रत दाखल केले आहेत. त्यांना नि.६१ ते नि.६३ देण्यात येते.

१६. दाव्यातील आखीव पत्रिका दाखल केली आहे. त्याला नि.६४ देण्यात येते.

१७. दावा मिळकतीचा नकाशा दाखल केला आहे. त्याला नि.६५ देण्यात येते.

१८. दावा मिळकतीचा चौकशी पंजी दाखल केली आहे. त्याला नि.६६ देण्यात येते.

१९. दिवाणी दावा क्र.८१/२००२ मधील नि.१ दाखल केले आहे. त्याला नि.६७ देण्यात येते.

२०. कॉम्प्रमाईज मेमो व डिक्री दाखल केले आहे. त्याला नि.६८ व नि.६९ देण्यात येते.

२१. मोजणीचा नकाशा दाखल केला आहे. **(परंतु वरील दस्ताला निशाणी देण्यास प्रतिवादीने हरकत घेतली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार प्रमाणित प्रत असल्यामुळे व ज्याने तयार केला त्याची साक्ष घेण आवश्यक आहे तसेच कलम ८३ भारतीय पुरावा कायदयान्वये तयार केलेला नाही. वादीचे वकील श्री. पिंपळकर यांच्या म्हणण्यानुसार दस्ताला निशाणी देण्यास काही हरकत नाही कारण नि.दिवाणी दावा ८१/२००२ मध्ये याच पक्षकारांमध्ये मालमत्तेच्या कब्ज्याबद्दल वाद झाला, त्यामध्ये तडजोड झाली होती, त्यामध्ये नकाशा तयार करण्यात आला होता, त्यामुळे त्याला निशाणी देण्यात यावी..... दोन्ही पक्षांचा युक्तीवाद**

ऐकून घेतला.. वरील वादमुद्दयावर युक्तीवादाकरिता पिंपळकर साहेबांनी वेळ मागितला ..... युक्तीवादाकरिता वेळ देण्यात येते.)

घरभाडेचे रशीदा व मनीऑर्डर पावत्यांना निशाणी देण्यास प्रतिवादीचे वकील श्री. मांडवकर यांनी हरकत घेतली आहे, करिता वादीचे वकील श्री. पिंपळकर यांना पूढील कार्यवाहीकरिता तारीख पाहिजे आहे त्याकरिता त्यांच्या तोंडी विनंतीवरून पूढील तारीख देण्यात येते.

उलट तपास पूढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात येते.

वा.दा.ब.अ.क.केले. समक्ष,

दि.न्या क.स्तर.
उमरेड

(ए.व्ही. पंडित)
सह. दिवाणी न्यायाधीश,(क.स्तर),
उमरेड.
दि.२१.०१.२०१९

DISTRICT COURT NAGPUR